# राशिभविष्य - जुलै, २०१८.

दादा दामले( dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत असलेल्या हर्षलमुळे या राशीच्या मंडळीचा वर्तमान स्वभाव अतिशय अस्थिर, चंचल, लहरी असा घडला असावा, असे वाटते. तसे खरोखरच असेल तर कोणाचाही धाक, दडपण असह्य होत असेल. या राशीची लहान मुले सध्या अतिशय वांड, खोडकर अशी झाली असावीत, असेही दिसते. असे असले तरी या राशीच्या प्रथम स्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल हे निश्चित. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच सर्व प्रकारे अनुकुल होणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. आरोग्य चांगले राहील, वरिष्ठ तुमच्या कामावर खूष होतील. त्यामुळे काहीना बढती, पगारवाढ, शासकीय नोकरदार मंडळीपैकी कोणास उच्च पद किंवा मानाचे स्थान असे काही मिळू शकेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती प्रतिकुल होणे संभवते. त्यामुळे अनारोग्य, दु:ख, कामात होणारी दिरंगाई, कौटुंबिक त्रास, वाढता खर्च, अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. त्यामुळे काहींना गहरे नैराश्य येणेही शक्य दिसते. पण बुध ग्रहामुळे मित्रसुख व गृहसौख्य मिळू शकेल. चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या कला क्षेत्रातील मंडळींना कोणत्याही आर्थिक लाभाची अपेक्षा न करता केवळ कलेसाठी कला हे तत्व लक्षात घेऊनच कलाविष्काराचा आनंद व सुखसमाधान लाभू शकेल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील, प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील, विवाहेच्छू युवक युवतींचे विवाह होतील. काहींना प्रवासयोग येतील तर काहींना आर्थिक लाभ होणेही संभवते. कुमार्गी मित्रांपासून दूर राहा. नेपच्यूनमुळे आर्थिक घोटाळे, येणाऱ्या धनास विलंब होणे संभवते. जपा. या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(२) वृषभ -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. पण हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. जपा. तसेच राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक समस्या त्रस्त करतील. आर्थिक नुकसान होणे संभवते. तसेच वाढत्या खर्चाची चिंता त्रस्त करील. जपा.

कुटुंबात वाद, भांडणे होणे संभवते. काही मंडळीना नेत्रविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. शुक्रामुळे गृहसौख्य लाभेल, ऐषाराम मिळेल. ज्यांच्या मालकीची शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून लाभ होईल. नोकरचाकराचे सुख मिळेल. आरोग्यात सुधारणा होईल. बौद्धिक, आध्यात्मिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. अन्य व्यवसायांत अस्थिर परिस्थिती निर्माण होईल. अष्टम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना एखादा मोठा आजार होणे संभवते. काही मंडळींना असमाधानकारक घटनांना तोंड द्यावे लागेल. काहींना अपेक्षाभंगाचे दु:ख सहन करावे लागेल. कर्जबाजारी असणारांना आर्थिक चिंता त्रस्त करील. शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. भाग्यस्थानी असलेल्या केतुमुळे काही जणांचे “वरून कीर्तन, आतून तमाशा “ असे ढोंगी आचरण होणे संभवते. तसेच या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात विविध कारणानी बाधा येणे संभवते. व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे वाईट प्रसंग, जीवावरचे प्रसंग, बेअब्रू करणारे प्रसग निर्माण होतील. जपा. काहीही कारणाने मैत्रीतून शत्रुत्व निर्माण होण्याची दाट शक्यता दिसते. जपा, श्रद्धा असेल तर इष्ट दैवताची व श्रीगजाननाची उपासना अनुकुल व मनस्वास्थ्य देणारी अशी सिद्ध होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात विविध आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. काही मंडळींना गलितगात्र झाल्यासारखे वाटेल. रक्तदाब, हृदय विकार असे आजार असलेल्यांनी विशेष जपावे. रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी गेल्यावर कुटुंबात वाद, भांडणे होणे संभवते. जपा. राहूमुळे कुटुंबात भांडण होणे संभवते. तसेच आर्थिक चिंता त्रस्त करतील. कुटुंबप्रमुख असाल तर खूप कष्ट करावे लागतील. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्रीग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे सहज शक्य होईल. प्रेमसंबंध असतील तर ते घटट होतील. सर्व सुख लाभेल. ज्या स्त्रियांचा या महिन्यात प्रसूतिकाळ आहे त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. जीवनसाथी शांत, विचारी आचरणाचा/ची असू शकेल. कायदा अभ्यासास शनि ग्रह अनुकुल व प्रगतिकारक होईल. अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे उष्णताविकाराचे अनारोग्य त्रस्त करील. वीज, पाणी यांपासून धोका असल्याने विजेची उपकरणे काळजीपूर्वक हाताळा. जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहू नका. किरकोळ अपघाताने हाडमोड होणेही संभवते. तसेच काहींना त्वचा रोगाचा किंवा रक्तविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे प्रगती करणे व मन:शांती मिळवणे शक्य होईल. लाभस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. पण काही मंडळीना अर्थलाभही

होणे शक्य आहे. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना करा. तसेच श्रीगणेश उपासनाही करा. " गणपति अथर्वशीर्षाचे " दररोज नियमितपणे पठण करा.

**(४) कर्क -** सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडत गेल्या तर अस्वस्थ व्हाल व गहरे नैराश्य येऊ शकेल. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. जपा. काही मंडळींना प्रचंड थकवा येईल. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी मनस्थिती शांत ठेवण्याचा सतत प्रयत्न करावा. काही मंडळीना कुसंगतीची बाधा त्रस्त करील. काहींच्या मैत्रीत शत्रुत्व निर्माण होईल. शिवाय धननाश होणेही संभवते. जपा. काही मंडळीना वातविकार त्रस्त करतील. परंतु शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार होतील; पण नाते- वाईक मंडळीपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना , शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक असा सिद्ध होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या मंगळ व केतुमुळे वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी किंवा दोघांपैकी कोणाच्या तरी अनारोग्यामुळे किंवा अन्य कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जलभय, विषभय असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहण्यास जाऊ नका. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, पगारवाढ अशापैकी लाभ होणे संभवते. कर्क राशी गुरु ग्रहाची उच्च राशी असल्याने श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. गुरुवारचा उपवास करा. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व त्यामुळे मनस्ताप सहन करावा लागेल. काही मंडळीना गहरे नैराश्य
येणे संभवते. दु:ख, चिंता, अनपेक्षित होणारे खर्च अशापैकी कारणानी त्रस्त व्हाल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे उष्णता विकार बळावण्याची शक्यता आहे. ताप येणे, इजा होणे, अंगावर फोड येणे अशापैकी आजार होण्याची शक्यता आहे. जपा. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी मनाचा क्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. काही मंडळीना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. तसेच चोरी किंवा अन्य काहीही कारणाने आर्थिक हानी होण्याची शक्यताही आहे.

जपा. पण मंगळ ग्रहाबरोबर केतूही असल्याने व तो अनुकुल असल्याने प्रतिकुल परिस्थिती अटोक्यात राहील. प्रथम स्थानी असलेला शुक्र वैवाहिक जीवनातील सुखास अनुकुल असला तरी सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे त्यात बाधा येणे संभवते. भाग्य स्थानी असलेल्या हर्षलमुळे काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील तर काहीना परदेशवारीची संधी मिळेल. तसेच शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना त्यांच्या नियोजित कार्यात प्रगती केल्यामुळे समाधान वाटेल व अन्य प्रकारचे लाभ होतील.. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या साहित्यिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. पण भावंडाकडून त्रास दिला जाणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मनावरील ताण नाहीसा होऊन मन:शानी लाभेल.

(६) **कन्या -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. काहींना आर्थिक लाभ होतील, तर काहींना मानाचे स्थान, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होईल. स्वतंत्र व्यवसाय असणारांना त्यांच्या व्यवसायात प्रगती करणे सहज शक्य होईल. त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राहील. लाभस्थानी असलेल्या बुधामुळे नवे मित्र मिळतील. धनलाभ होणेही संभवते. त्यामुळे सुख-समाधान लाभेल. पण चुतुर्थ स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. माता असेल तर तिला कसला तरी आजार त्रस्त करील. पंचम स्थानी असलेल्या मंगळ व केतूमुळे संततिसुखात बाधा येऊ शकेल. संततीपैकी कोणाची आचरणविषयक समस्या, कोणाचे मनाविरुद्ध वागणे, कोणाचे अनारोग्य अशापैकी कारणानी संततिसुख लाभणे कठीण दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. षष्ठ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आपल्याला कसला तरी आजार झाल्याची भावना त्रस्त करील. तसेच काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. अपघात भय असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. वाहन विचाराच्या तंद्रीत किंवा अति वेगाने चालवू नका. विजेची उपकरणे योग्य रीतीने हाताळा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे व “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

(७) **तुळा -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असावी, असे वाटते. त्यामुळे प्रतिकुलतेचा आघात सहन करणे कठीण जात असावे,

असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होणार आहे. महिन्याच्या पूर्वार्धात मानसिक ताण, वडील व्यक्तींचा विरोध, क्वचित कोणाची होणारी पदावनती, अनारोग्य अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. म्हणून महिन्याच्या पूर्वार्धात मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच आचरण करा. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात बदलणाऱ्या अनुकुल परिस्थितीचा आनंद अनुभवू शकाल. महिन्याच्या उत्तरार्धात मोठ्या ओळखी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा ओळखीचा लाभ तुम्हांस मिळू शकेल. काही मंडळीना बढती, काहींना पगारवाढ अशापैकी लाभ होणे संभवते. इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याची शक्यताही दिसते. काहींना एखादे अधिकार पद मिळणेही शक्य आहे. चिकित्सक बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ यशदायक होईल. या राशीच्या लेखकवर्गाचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. त्यामुळेच सर्व प्रकारचे आरोग्य सुधारू शकेल. या राशीच्या काही युवकयुवतींना अपेक्षित अशी नवी नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील .जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ व केतू या ग्रहांमुळे कौटुंबिक जीवनात वाद, गैरसमज, भांडणतंटे, असमाधानकारक घटना अशापैकी परिस्थितीमुळे कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. अशा प्रतिकुल परिस्थितीत आध्यात्मिक उपासना केलीत, मौन व्रत धारण केलेत तर प्रतिकुल काळही सुसह्य होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे विविध कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. शिवोपासना अनुकुल होईल.

(८) **वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना शनि ग्रहाची साडेसाती असल्यामुळे त्यांनी सतत मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून व सहनशील बनूनच आचरण करावे. कुटुंबात
अनिष्ट घटना घडणे, प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर होणे, न्यायालयीन प्रकरणाचा त्रास होणे, आर्थिक चिंता सतावणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. पण मंगळ ग्रह अनुकुल असल्याने धैर्य, हिम्मत , महत्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तबगारीचे कृत्य घडेल. केतू ग्रह या राशीच्या व्यापारी मंडळीना अनुकुल होईल. घरगुती परिस्थिती अनुकुल राहावी यासाठी वाद, गैरसमज होणार नाहीत, याची काळजी घ्या. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल होईल; पण अति विचाराने डोकेदुखीचा आजार त्रस्त करील. काहींना मेंदू विकाराचा त्रासही सहन

करावा लागेलसे दिसते. जपा. कलात्मक व्यापार, व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच काही प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात मानसिक ताण, आजार, प्रतिकारशक्ती नसणे, वडील मंडळींचा विरोध, अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. जपा. सामाजिक कार्याची आवड असणारांना तसेच अध्यात्मात रस असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात असह्य त्रास होण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “श्रीगणपती अथर्वशीर्षा”चे व “ श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा.

**(९) धनु -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीना आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता दिसते. मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असण्याची शक्यता वाटते. तसे असेल तर गहरे नैराश्य येणे संभवते. स्वत:च्या अनारोग्यासह जीवनसाथीच्या अनारोग्याची चिंताही त्रस्त करील. कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाले असल्यास मनस्थिती अधिकच अस्वस्थ करील. या राशीच्या धनस्थानी असलेल्या मंगळ व केतुमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. अनपेक्षितपणे येणारी आर्थिक जबाबदारी व ती कशी पूर्ण करावयाची याची चिंता त्रस्त करील. येणे असलेले धन हाती येणारच नाही; पण देणे असलेली रक्कम कशी द्यायची या विचाराने अस्वस्थ व्हाल. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून घसा, दाढा, मान यांचे उष्णताविकाराचे दुखणे त्रस्त करील. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीत आध्यात्मिक उपासना केल्यास मन:शक्ती प्राप्त होईल व प्रतिकुल काळाशी मुकाबला करणे शक्य होईल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र अस्णारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल व नियोजित कार्यात प्रगती करणे, यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या इतर नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध काही प्रमाणात अनुकुल होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात अपयश, मानहानी, इच्छा आकांक्षा अपूर्ण राहणे, संततिविषयक समस्या त्रस्त करणे अशा घटना घडणे संभवते. अशा परिस्थितीत ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांना कामीजास्त प्रमाणात असा धनलाभ होईल. गुरु- शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

(**१०) मकर -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव हट्टी, जिद्दी, मानापमान फार असणारा, असा झाला असावा, असे वाटते. तसे असेल तर अकारण श्रम, दगदग कराल; पण हाती काही लागणार नाही. त्यामुळे शारीरिक अनारोग्य मात्र होईल. जपा. केतू ग्रह अनुकुल असला तरी वाहनधोका देणारा असल्यामुळे वाहन सावधानतेने
व वेग नियंत्रण राखून चालवा. रस्त्याने विचाराच्या तंद्रीत चालू नका. आर्थिक समस्या निर्माण झाल्यास व आर्थिक व्यवहारात घोटाळे निर्माण झाल्यास असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. त्यामुळे गहरे नैराश्य येणें संभवते. जपा. चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे घरात कोणाशी पटणार नाही, त्यामुळे गृहसौख्य लाभणार नाही. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध अनारोग्यकारक होऊन पोटाचे विकार निर्माण होतील. जपा. पण नोकरीच्या दृष्टीने लाभदायकच असेल. गुरु ग्रह बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रास अनुकुल असल्याने असे कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. वरिष्ठ कामाचे कौतुक करतील. काही मंडळीना नवे कार्यक्षेत्र मिळणेही संभवते. या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग असेल अशांना असा अचानक धनलाभ होऊ शकेल. पण तोच शुक्र ग्रह या राशीच्या वृद्ध मंडळीना प्रतिकुल होईल. व्ययस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे मनस्ताप देणाऱ्या घटना घडल्यास नैराश्य येईल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत कोमल झाली असून मानसिक संवेदना अति शीघ्र होत असाव्यात असे वाटते. तसे असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असावे, असेही वाटते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला हर्षल ग्रह उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असून तो स्मरणशक्ती व आकलन शक्ती देणारा असाच आहे. शिवाय कुंभ ही राशी बौद्धिक राशी असल्याने उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास उपयुक्त होईल. म्हणून असे कार्यक्षेत्र असणारांनी या अनुकुल काळाचा लाभ घ्यावा व कार्यरत होऊन प्रगती व यश साध्य करावे, असे आवर्जून सांगावेसे वाटते. या हर्षलमुळे काही भाग्यवंतांना परदेशगमनाची संधी मिळणेही शक्य आहे. रवि ग्रह या महिन्याच्या उत्तरार्धातच अनुकुल होणार असल्याने या राशीच्या नोकरदार मंडळींनी जे काय साध्य

करावयाचे ते महिन्याच्या उत्तरार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. शिवाय शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. तसेच मुलांपैकी कोणाच्या आजारपणाची समस्या त्रस्त करण्याची शक्यताही दिसते. जपा. राहूमुळे इतर जातिधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होणे संभवते. शुक्र ग्रह अनुकुल असल्याने या राशीच्या मंडळीना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे आध्यात्मात रस असेल तर उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. लाभस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे संतातिविषयक समस्या त्रस्त करील. व्ययस्थानी असलेले मंगळ-केतू सतत मनस्ताप देणाऱ्या घटनांना जबाबदार असतील. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनस्थिती शांत, स्वस्थ राहील. दररोज नियमितपणे " हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** एकंदरीत विचार करता या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ मुळीच अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. त्यामुळे या संपूर्ण महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीनी मन व विचारशक्तीवर ताबा ठेवून आणि सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. लहरी स्वभाव व मन व बुद्धी अस्थिर राहणार असल्याने अविचाराने खर्च होणे संभवते. तसेच विचित्र आचरण होणेही संभवते. शिवाय आपल्या अविचारी फटकळ बोलण्याने अकारण समोरची व्यक्ती दुखावली जाणेही संभवते. जपा.

या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यात कौटुंबिक त्रासाची भर पडेल. त्यामुळे काही मंडळीना नैराश्य येईल तर काहीना शारीरिक अनारोग्य त्रस्त करील. राहूमुळे संततिसमस्या त्रस्त करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. पण हा राहू कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. बुधामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. मात्र त्यांना आपले सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. या राशीच्या काही मंडळींची उच्च योग्यता असूनही त्यांना आपले कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. उलट नको ते आळ येणे संभवते. काही महाभाग व्यसनाधीन होण्याची शक्यता जाणवते. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली सल्ला- गारी व्यवसाय, कोळसा, लोखंड व्यापारी यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. इतरांना कष्ट, परिश्रम करूनच अर्थ प्राप्ती होईल. जन्मकुंडलीत योग असेल तर काही भाग्यवंताना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. प्रवासाचे योग येतील. नेपच्यूनमुळे मानसिक व्यग्रता व चिंता त्रस्त करील. पण गुप्त पोलीस असणारांना हा नेपच्यून अनुकुल व

लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेवदत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====